जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४५२ दिनांक - २१/०६/२०२३**

## उत्तमनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## दहशत निर्माण करणा-या सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख श्री ऊर्फ शि-या वाघमारे व त्याचे टोळीतील इतर ४ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई.

दि.२२/०५/२०२३ रोजी फिर्यादी व त्यांचा मित्र असे राहते घराच्या बाहेर रस्त्यावर बसले होते. सदर वेळी तीन मोटार सायकल वरुन श्री वाघमारे व त्याचे इतर साथिदार त्यांचे हातात कोयता, लाकडी बांबु घेऊन तेथे आले. व फिर्यादीच्या अंगावर धावुन आले व ह्या एरीयातील पोरांनी आमच्या मित्राला मारले आहे, आज याला मारुन टाकणार असे बोलुन त्याचे हातातील लोखंडी हत्याराने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे अंगावर मारला असता तो त्यांच्या मांडीला लागुन त्यांना दुखापत झाली. त्यानंतर फिर्यादी व त्यांचा मित्र तेथुन पळुन गेले. सदरवेळी आलेल्या मुलांनी तेथे दिसेल त्या व्यक्तीला मारहाण करण्यात सुरवात केली तसेच तेथील दुकानावर दगड मारून दुकानाचे नुकसान केले त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन उत्तमनगर पोलीस ठाणे गु.र.क्रं ५९/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७,३२३ ,५०४ ,५०६,१४३, १४५,१४७,१४८ आर्म अ‍ॅक्ट ४(२५) म.पो.का.३७(१)सह १३५,क्रिमीनल लॉ अ‍ॅक्ट ७ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सदर गुन्हा हा **१)श्री ऊर्फ शि-या गणेश वाघमारे,वय २२ वर्षे, रा.राहुल नगर, शिवणे,पुणे २) प्रतीक संजय नलावडे, वय २४ वर्षे, रा.फ्लॅट नं.१३, दुसरा मजला,गंगा बिल्डींग,कोंढवे-धावडे, पुणे** यांना नमुद गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली असुन सध्या ते न्यायालयीन कोठडीत येरवडा कारागृह येथे आहेत व **इतर त्याचे ३ अल्पवयीन साथीदार पैकी एक अल्पवयीन हा रिमांड होम पुणे येथे असुन दोन अल्पवयीन यांना पालकांच्या ताब्यात दिले आहे.**

आरोपी श्री उर्फ शिऱ्या गणेश वाघमारे, वय २१ वर्षे, रा.राहुलनगर शिवणे पुणे (टोळीप्रमुख) व त्याचे साथीदारासह त्याने बेकायदेशीर मार्गाने अवैध आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने, तसेच वारजे, उत्तमनगर या भागात आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणेचे उददेशाने गुन्हयातील साथीदार आरोपीतांना व परीसरातील अल्पवयीन बालकांना भुरळ घालुन स्वतःबरोबर घेवून स्वतःचे अधिपत्याखाली आपली संघटित गुन्हेगारी टोळी स्थापन केलेली आहे. त्याने टोळीतील वेगवेगळे साथीदार सदस्यांना बरोबर घेवुन खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, मारामारी, गैरकायदयाची मंडळी जमवणे, गंभीर दुखापत करणे, बेकायदा घातक शस्त्र जवळ बाळगणे, शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन, लोकांचे मालमत्तेची तोडफोड, नुकसान करुन दहशत करणे, बेकायदेशीर घरात घुसणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी कृत्ये सातत्याने चालु ठेऊन आपल्या संघटित गुन्हेगारी टोळीचे अस्तित्व, वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी दहशत पसरवून अवैध आर्थिक फायदयासाठी आपले टोळीचे गुन्हेगारी स्वरुपाचे वर्चस्व सतत वाढवित आहे.

यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुनही ते कारवाईस धजावत नव्हते व त्यांचे वर्तनात काही एक सुधारणा होत नव्हती त्यामुळे नमुद गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधि.सन १९९९ चे कलम ३(१)(II), ३(४) चा अंतर्भाव करणेकामी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधि.क़लम २३(१) नुसार मान्यता मिळणे करीता उत्तमनगर पोलीस ठाणेचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सुनील जैतापुरकर यांनी मा.पोलीस उपायुक्त परी ०३ पुणे शहर श्री.सुहेल शर्मा यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री, प्रवीण पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करुन आरोपी १) श्री गणेश वाघमारे, वय २१ वर्षे, रा. राहुलनगर शिवणे पुणे (टोळीप्रमुख), प्रतिक संजय नलावडे, वय २४ वर्षे, रा. रा.फ्लॅट नं.१३, दुसरा मजला,गंगा बिल्डींग, कोंढवे-धावडे, पुणे व त्याचे ३ अल्पवयीन साथीदार यांचेविरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधि. सन १९९९ चे कलम ३(१)(II),३(४) चा अंतर्भाव करणे बाबत मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री, प्रवीण पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरूड विभाग,पुणे शहर श्री.भिमराव टेळे हे करीत आहे

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री. संदीप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री. प्रवीण पाटील मा.पोलीस उपायुक्त परी ०३, पुणे शहर श्री सुहेल शर्मा, मा.तत्कालीन सहा.पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग, पुणे शहर श्री. सुनिल पवार, यांचे मार्गदर्शनाखाली तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उत्तमनगर पो.स्टे. श्री सुनिल जैतापुरकर, विद्यमान वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. किरण बालवडकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती शबनम शेख,सपोनि दादाराजे पवार,सपोनि उमेश रोकडे,पोलीस अमंलदार नांगरे, हजारे,पवार, गायकवाड, पाडाळे, तोडकर सर्व नेम उत्तमनगर पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियत्रंणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांची हालचालीवर बारकाईने लक्ष ठेऊन गुन्हेगारचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस आधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्याचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ३० वी कारवाई आहे.**